


सोलापूर महानगरपालिका
कामगारकल्याण जनसंपर्क विभाग



# सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील होर्डिंग, फ्लेक्स परवानगी बाबत बैठक

**Volume** IX **Issue** 04 Date 07-09-2023

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील होर्डिंग, फ्लेक्स परवानगी बाबत महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली- उगले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त विद्या पोळ,उपायुक्त मच्छिंद्र घोलप, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, सार्वजनिक आरोग्य अभियंता विजय राठोड, सर्व विभागीय अधिकारी, संगणक विभागाचे प्रमुख स्नेहल चपळगावकर, अवेक्षक विक्रमसिंह पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत होर्डिंग फ्लेक्स परवानगी बाबत आढावा घेण्यात आला तसेच सदर बैठकीत शहरातील होर्डिंग साठी परवानगीचे प्रक्रिया सुलभ होण्याकरिता सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये नागरिकांना शहरातील अनधिकृत होर्डिंग,फ्लेक्सच्या तक्रारी दाखल करण्याकरिता परिवर्तन ॲपचा ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे.त्यावरती तक्रारी करू शकतात. तसेच वाहतूक विभागासोबत संयुक्त बैठक घेऊन शहरात डिजिटल फ्लेक्स लावण्याकरिता झोननिहाय जागा निश्चिती करण्यात येणार आहे. तात्पुरत्या होर्डिंग फ्लेक्सची अधिकतम आकार ही शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे लावण्यात यावा. तसेच होर्डिंग्स फ्लेक्स परवानगी सुलभा होण्याकरिता संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे.

चौकट

नो डिजिटल झोन मध्ये होर्डिंग, फ्लेक्स लागल्यास तत्काळ त्या फ्लेक्स वरती असलेल्या व्यक्तींच्या नावाने गुन्हा दाखल करण्यात येईल.तसेच इतर ठिकाणी विना परवना होर्डिंग, फ्लेक्स लागल्यास त्यांच्यावर ती महापालिकेच्या वतीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती महापालिकेच्या आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.